# मुंबई विद्यापीठ

संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
मुंबई विद्यापीठ, मुंबई ४०००९८

## परिपत्रक

No. DBoEE/ICC/2021-22/16

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील द्वितीय सत्र (हिवाळी २०२१) परीक्षेच्या आयोजनाबाबत.**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचलित महाविद्यालयांचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपपरिसरांचे समन्वयक/ संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ (हिवाळी २०२१) परीक्षेच्या आयोजनासाठी परीक्षा व मुल्यमापन मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबधितांनी परीक्षेच्या आयोजनासंदर्भात खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

1) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ (हिवाळी २०२१) परीक्षेच्या पदवी, पदव्युत्तर व पदविका या परीक्षेस जे विद्यार्थी परीक्षा अर्ज सादर करतील त्याच विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात यावी.

2) महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची माहिती संकलित करावी (उदा. मोबाईल नंबर, ईमेल, PRN क्रमांक, ऑनलाईन परीक्षेबाबत लागणारी साधन सामग्री जसे लॅपटॉप, संगणक, स्मार्ट फोन, इंटरनेट व विद्यार्थी सद्यपरिस्थीत कुठे आहे इत्यादी). या परिपत्रका सोबत वरील संदर्भातील मार्गदर्शक नमुना जोडला आहे (Annexure -A), तरी महाविद्यालयांनी आवश्यकतेनुसार त्या नमुन्यात योग्य तो बदल करुन, विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्यासाठी त्वरीत पाठवावा.

3) प्रात्यक्षिक/प्रकल्प/मौखिक परीक्षा ह्या ऑनलाईन पद्धतीने घेण्यात याव्यात.

4) परीक्षेच्या सुयोग्य आयोजनासाठी विद्यापीठाने सर्व विद्याशाखांच्या महाविद्यालयांचे (College Cluster) तयार केलेले आहेत व प्रत्येक क्लस्टर मधील एका महाविद्यालयास लीड महाविद्यालय म्हणून विद्यापीठाने परीक्षेच्या नियोजनाची निश्चित केलेली जबाबदारी पार पाडावयाची आहे.

5) विद्यापीठामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांसाठी जे विद्यार्थी परीक्षा अर्ज भरतील त्यांना आसन क्रमांक (Seat Number) देण्यात येतील त्याचा वापर परीक्षा घेण्यासाठी महाविद्यालयांनी करावा.

6) महाविद्यालयांना परीक्षा घेण्यासाठी जे विविध अहवाल (Report) आवश्यक असतात ते MKCL पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात येतील, तसेच काही परीक्षांचे अहवाल (Report) पारंपारिक पद्धतीने महाविद्यालयांना पाठविण्यात येतील.

7) ज्या अभ्यासक्रमांना अंतर्गत परीक्षा (Internal Exams / Term work) आहेत त्या अभ्यासक्रमांच्या गुणांच्या नोंदी महाविद्यालयांनी ऑनलाईन दिनांक १५ नोव्हेबंर, २०२१ च्या आत सादर कराव्यात.

8) अंतिम सत्रात प्रविष्ट असलेल्या विद्यार्थ्यांच्या Lower Exam चे निकाल ऑनलाईन पद्धतीने अपलोड करण्याविषयी कळविण्यात आले होते, परंतु त्यात ज्या महाविद्यालयांनी नोंदी पुर्ण केलेल्या नसतील, त्यांनी त्या त्वरीत पूर्ण कराव्यात.

9) Practical, Project, Viva-Voce परीक्षा प्रत्येक महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांच्या सहाय्याने ऑनलाईन पद्धतीने (Zoom App., Google Meet, Skype इत्यादी मिटींग ॲप्स) किंवा आवश्यकतेनुसार दुरध्वनीद्वारे मौखिक परीक्षा दिनांक १५ ऑक्टोंबर, २०२१ पासून घेण्यात याव्यात. मौखिक परीक्षा घेण्यासाठी प्रश्नसंच तयार करण्यात यावेत. विद्यार्थ्यांच्या परीक्षेतील उपस्थिती बाबत नोंदी ठेवण्यात याव्यात. सदर परीक्षांचे गुण हे MKCL पोर्टलवर किंवा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर परीक्षेनुसार त्वरीत अपलोड करण्यात यावेत.

10) ऑनलाईन थेअरी परीक्षेचे वेळापत्रक हे लीड महाविद्यालयाने क्लस्टर मधील महाविद्यालयांशी चर्चा करुन साधारणत: क्लस्टर मधील सर्व महाविद्यलयांच्या परीक्षा ह्या एकाच वेळी घेण्यात येतील अशा पद्धतीने वेळापत्रक तयार करावे व सर्व महाविद्यालयांनी हे वेळापत्रक विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

11) पारंपरिक पदवी (कला, वाणिज्य व विज्ञान ) परीक्षेतील खाली नमुद अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे Choice Base Semester V च्या परीक्षांसाठी, परीक्षा विभागाकडून स्वतंत्र वेळापत्रक जाहिर करण्यात येईल, तसेच या परीक्षांसाठी महाविद्यालयांना Question Bank विद्यापीठाकडून पाठविण्यात येईल, त्याचा वापर करून महाविद्यालयांनी आपल्या स्तरावर विद्यापीठाने जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार परीक्षा घ्याव्यात.

मानव्यविज्ञान विद्याशाखा (Humanities) - B. A. ( Multimedia and Mass Communication - ( with credits ) )

वाणिज्य विद्याशाखा (Commerce) - B.M.S., B. Com (Account & Finance)., B. Com. (Finance & Mgt.), B. Com. (Banking & Insurance), B. Com. (Investment & Management), B. Com. (Finance & Marketing), B. Com. (Transport Management)

विज्ञान विद्याशाखा (Science) – B.Sc. (Computer Science), B.Sc. (Bitotech) B.Sc. (Human Science), B.Sc. (I.T.), B.Sc. (Hospital Studies), B.Sc. (Aviation), B.Sc. (Aeronautics),

उर्वरीत ऑनलाईन थेअरी परीक्षेचे वेळापत्रक तयार करतांना :

पारंपरिक (कला, वाणिज्य व विज्ञान) पदवी परीक्षा

सत्र ५ (नियमित व बॅकलॉग ) दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ ते ०४ डिसेबंर, २०२१ पर्यंत घेण्यात याव्यात.

सत्र ६ (बॅकलॉग) दिनांक ०७ डिसेबंर, २०२१ ते २० डिसेबंर, २०२१ पर्यंत घेण्यात याव्यात.

12) पारंपरिक (कला, वाणिज्य व विज्ञान) पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सत्र १ व सत्र ३ (नियमित व बॅकलॉग) परीक्षांसाठी, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ यांच्याकडून स्वतंत्र वेळापत्रक जाहिर करण्यात येईल, तसेच या परीक्षांसाठी महाविद्यालयांना Question Bank विद्यापीठाकडून पाठविण्यात येईल त्याचा वापर करून महाविद्यालयांनी आपल्या स्तरावर विद्यापीठाने जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार परीक्षा घ्याव्यात.

13) अभियांत्रिकी पदवी परीक्षा सत्र ७ ( नियमित व बॅकलॉग) तसेच औषधनिर्माण शास्त्र पदवी परीक्षा सत्र ७ ( नियमित व बॅकलॉग) परीक्षांसाठी परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ यांच्याकडून स्वतंत्र वेळापत्रक जाहिर करण्यात येईल तसेच या परीक्षांसाठी महाविद्यालयांना Question Bank विद्यापीठाकडून पाठविण्यात येईल, त्याचा वापर करून महाविद्यालयांनी आपल्या स्तरावर विद्यापीठाने जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार परीक्षा घ्याव्यात.

14) विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख /संचालक आपल्या स्तरावर परीक्षेचे नियोजन करतांना आवश्यकता असल्यास परीक्षा पद्धतीत ( Exam Pattern) बदल करू शकतील तसेच परीक्षेचे वेळापत्रक स्वतंत्ररीत्या तयार करू शकतील. यात सर्व परीक्षा ह्या ५० गुणांच्या घेण्यात याव्यात व Maximum गुणांमध्ये रूपांतर करून विद्यापीठाच्या ऑनलाईन प्रणालीमध्ये गुणांची नोंद (Upload) करावी.

15) B. Ed. (Semester III), Law (3 Years Course) (Semester V) व Law (5 Years Course) (Semester IX) नियमित अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी परीक्षा विभागाकडून स्वतंत्र वेळापत्रक जाहिर करण्यात येईल, तसेच या परीक्षांसाठी महाविद्यालयांना Question Bank विद्यापीठाकडून पाठविण्यात येईल त्याचा वापर करून महाविद्यालयांनी आपल्या स्तरावर विद्यापीठाने जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार परीक्षा घ्याव्यात.

वर नमुद अभ्यासक्रमांव्यतिरीक्त नियमित व जुन्या अभ्यासक्रमांच्या परीक्षा ह्या महाविद्यालयीन स्तरावर लीड महाविद्यालयांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयांमार्फत घेण्यात याव्यात.

16) विद्यापीठ प्राधिकरणांनी ठरविल्याप्रमाणे सर्व थेअरी परीक्षा ह्या बहुपर्यायी (Multiple Choice Question) प्रश्न देऊन ऑनलाईन पद्धतीने घेण्यात याव्यात व ज्या विद्यार्थ्यांकडे ऑनलाईन परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध नसेल त्यांच्यासाठी ऑनलाईन परीक्षा देण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी, पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यासाठी स्थानिक प्रशासनाची मदत आवश्यक असल्यास, स्थानिक प्रशासनास विनंती करावी.

17) पारंपरिक (कला, वाणिज्य व विज्ञान) पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सत्र २ (बॅकलॉग) व सत्र ४ (बॅकलॉग) परीक्षा १ डिसेंबर, २०२१ ते १५ डिसेबंर, २०२१ पर्यंत घेण्यात याव्यात.

18) ऑनलाईन थेअरी परीक्षेचे वेळापत्रक तयार करतांना या परिपत्रकासोबत जोडलेल्या (ANNEXURE – B) तक्त्याप्रमाणे कार्यवाही करावी. परीक्षा संपल्यानंतर ३ दिवसांच्या आत परीक्षांचे गुण ऑनलाईन पद्धतीने विद्यापीठाच्या पोर्टलवरती अपलोड करण्यात यावे.

19) पारंपारिक अभ्यासक्रमांच्या (कला, वाणिज्य व विज्ञान) पदवी व पदव्युत्तर परीक्षेसाठी ५० गुणांची ऑनलाईन थेअरी परीक्षा घेण्यात यावी यात ५० बहुपर्यायी प्रश्न (MCQ Type) देण्यात यावेत, सदर परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना एक तास वेळ देण्यात यावी.

20) व्यावसायिक अभ्यासक्रम (अभियांत्रिकी, एमसीए ) परीक्षेसाठी ८० गुणांची ऑनलाईन थेअरी परीक्षा घेण्यात यावी. थेअरी परीक्षेमध्ये २० गुणांची ऑनलाईन बहुपर्यायी परीक्षा (MCQ Type Exam) व ६० गुणांची वर्णनात्मक थेअरी परीक्षा (Descriptive Type Exam) अशी एकुण ८० गुणांची परीक्षा घेण्यात घ्यावी व परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना ०२ तास ३० मिनिटे वेळ देण्यात यावी.

व्यावसायिक अभ्यासक्रम फार्मसी परीक्षेसाठी ८० गुणांची ऑनलाईन थेअरी परीक्षा घेण्यात यावी. थेअरी परीक्षेमध्ये २० गुणांची ऑनलाईन बहुपर्यायी परीक्षा (MCQ Type Exam) व ६० गुणांची वर्णनात्मक थेअरी परीक्षा (Descriptive Type Exam) अशी एकुण ८० गुणांची परीक्षा घेण्यात यावी व परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना ०२ तास वेळ देण्यात यावी.

परीक्षेचे मुल्यांकन ऑनलाईन पद्धतीने करण्यात यावे. शिक्षकांनी परीक्षेचे मुल्यांकन ऑनलाईन पद्धतीने महाविद्यालयातच (College Computer Lab) करावे.

आर्किटेक्चर शाखेच्या परीक्षेसाठी ४० गुणांची ऑनलाईन बहुपर्यायी परीक्षा (MCQ Type Exam) व ८० गुणांसाठी Design Questions ची थेअरी परीक्षा घ्यावी व सदर परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना २ तास वेळ देण्यात यावा.

21) आंतर-विद्याशाखीय अभ्यासक्रमांच्या परीक्षेसाठी ३० गुणांची ऑनलाईन बहुपर्यायी परीक्षा (MCQ Type Exam) व ३० गुणांची ऑनलाईन वर्णनात्मक थेअरी परीक्षा (Descriptive Type Exam) अशी एकुण ६० गुणांची परीक्षा घेण्यात यावी. ३० गुणांच्या ऑनलाईन बहुपर्यायी परीक्षेसाठी (MCQ Type Exam) १० प्रश्न विचारण्यात यावेत व सदर परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना १ तास ३० मिनिट वेळ देण्यात यावा.

22) विधी शाखेच्या अभ्यासक्रमांच्या परीक्षेसाठी ३० गुणांची ऑनलाईन बहुपर्यायी परीक्षा (MCQ Type Exam) व ३० गुणांची ऑनलाईन वर्णनात्मक थेअरी परीक्षा (Descriptive Type Exam) अशी एकुण ६० गुणांची परीक्षा घेण्यात यावी. ३० गुणांच्या ऑनलाईन बहुपर्यायी परीक्षेसाठी (MCQ Type Exam) १० प्रश्न विचारण्यात यावेत व सदर परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना १ तास ३० मिनिट वेळ देण्यात यावा.

23) लीड महाविद्यालयांनी, आवश्यकतेनुसार विद्यापीठाचे अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता व अभ्यास मंडळाचे अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली, आपल्या क्लस्टर मधील महाविद्यालयातील शिक्षकांच्या सहाय्याने प्रत्येक विषयांसाठी (मराठी/इंग्रजी, आवश्यक त्या माध्यमानुसार) स्वतंत्र Question Bank तयार करण्यात यावी जेणेकरून तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अनेक वेगवेगळे प्रश्नपत्रिकेचे संच (Multiple Question Paper Sets) परीक्षेसाठी उपलब्ध होतील. Question Bank तयार करतांना अभ्यासक्रमातील सर्व युनिट्स/पाठ/प्रकरणे यांना योग्य ते weightage देण्यात यावे. बहुपर्यायी प्रश्न तयार करतांना विविध कठीण पातळीचा (Difficulty level - Easy, Average, Middle and Higher) विचार करण्यात यावा. अधिक माहितीसाठी विद्यापीठ परीपत्रक क्रमांक Exam/DBOEE/ICC/2020-21-4, दिनांक १३/०९/२०२० चे अवलोकन करावे.

24) प्रत्येक महाविद्यालयाने आपल्या स्तरावर ऑनलाईन परीक्षा घेण्यासाठीची तांत्रिक सुविधा निर्माण करावी व अनुभवासाठी विद्यार्थ्यांची सराव परीक्षा घ्यावी.

25) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन थेअरी परीक्षेसाठी आवश्यक त्या सुविधा देण्यात याव्यात (उदा. २० मिनिटे जास्तीचा वेळ देणे, लेखनिकाची मान्यता देणे इत्यादी)

26) ऑनलाईन पद्धतीने प्रत्येक विषयाची थेअरी परीक्षा झाल्यानंतर लगेचच मुल्यांकन प्रक्रिया करून विद्यार्थ्यांचे गुण तयार करावेत. थेअरी परीक्षेचे मुल्यांकन संबधित विषयाच्या Maximum (60,75,80,100 इत्यादी) गुणांनुसार रुपांतर करून विषयास Gracing Marks देऊन २ दिवसांच्या आत विद्यापीठाच्या ऑनलाईन सिस्टीम मध्ये अपलोड करावेत.

27) लीड महाविद्यालयांनी आपल्या क्लस्टर मधील महाविद्यालयातून एक समिती तयार करावी व त्या समितीने क्लस्टर मधील महाविद्यालयांच्या प्रत्येक विषयांच्या Gracing Marks बाबत आवश्यकतेनुसार निर्णय घेवून कार्यवाही करावी यासाठी परिपत्रक क्रमांक Exam/DBOEE/ICC/2020-21/12, दिनांक २५/०९/२०२० चे अवलोकन करावे.

28) जे विद्यार्थी काही तांत्रिक कारणास्तव ऑनलाईन थेअरी परीक्षा देऊ शकले नाहीत त्यांना पुन्हा संधी देण्याविषयी लीड महाविद्यालयांमार्फत एकत्रित निर्णय घेऊन अशा विद्यार्थ्यांना परीक्षेची संधी उपलब्ध करून द्यावी.

29) थेअरी परीक्षा बहुपर्यायी प्रश्नांच्या स्वरूपात घेण्यात येत असल्यामुळे यात विद्यार्थ्यांना निकाल जाहिर झाल्यानंतर पुनर्मुल्यांकनाची (Revaluation) सुविधा देता येणार नाही, परंतु वर्णनात्मक (Descriptive) प्रश्न असल्यास त्या प्रश्नांचे पुनर्मुल्यांकन (Revaluation) करता येईल.

30) परीक्षा घेण्यासाठी स्थानिक प्रशासनाची मदत आवश्यक असल्यास संबंधित जिल्हाधिकारी, तहसिलदार, पोलीस विभाग व विद्युत विभाग यांच्याशी संपर्क साधून आवश्यक त्या उपाय योजना करुन घ्याव्यात.

31) विद्यार्थ्यांना परीक्षेच्या काळात समुपदेशन मिळावे, त्यांना येणाऱ्या संभाव्य अडचणी व शंकाचे निरसन व्हावे तसेच परीक्षेचा अभ्यासक्रम, नमुना प्रश्नपत्रिका आणि नवीन पद्धतीने घेण्यात येणाऱ्या परीक्षांबाबत स्वयंस्पष्ट माहिती मिळावी, यासाठी प्रत्येक महाविद्यालयाने योग्य ती व्यवस्था करावी.

32) महाविद्यालयांच्या प्राचार्यांना काही शंका/समस्या असल्यास त्यांनी संबधित क्लस्टरच्या लीड महाविद्यालयाच्या प्राचार्यांशी संपर्क साधून त्यांना याबातीत कळवावे व लीड महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विद्यापीठाचे संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ /क्लस्टर निहाय संबधित विद्याशाखांचे अधिष्ठाता/सहयोगी अधिष्ठाता यांच्याशी संपर्क साधून सदर शंका/समस्यांचे निरसन करावे.

वरील सर्व बाबींचे काटेकोरपणे पालन करून विद्यापीठाच्या परीक्षा सुरळीत व वेळेत पार पडतील याबाबत सर्व प्राचार्यांनी दक्षता बाळगावी.

(डॉ. विनोद पाटील)
संचालक
परिक्षा व मुल्यमापन मंडळ

ठिकाण : मुंबई
दिनांक : २४ सप्टेंबर, २०२१

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१) विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित /संचलित महाविद्यालयांचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपपरिसरांचे समन्वयक/ संचालक,

२) सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग, विद्यानगरी परिसर, मुंबई विद्यापीठ, मुंबई

३) स्वीय सहाय्यक : १) कुलगुरु २) प्र—कुलगुरु ३) कुलसचिव

४) स्वीय सहाय्यक अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, मुंबई विद्यापीठ, मुंबई

५) स्वीय सहाय्यक अधिष्ठाता, मानव्य विज्ञान विद्याशाखा, मुंबई विद्यापीठ, मुंबई

# ANNEXURE – A

## Student information format

- Student Name: ____________________
- PRN No: ____________________
- Program Category : (B.Com/M.Com./ BA/MA/BSc/MSc etc.) ____________________
- Email address : ____________________
- WhatsApp No: ____________________
- Parent/Guardian Contact Number : ____________________
- Do you Have ?     ( Yes / No )

  a. Smartphone

  b. Laptop/Tab

  c. Desktop

  d. Internet Connectivity

  e. Any other gadget

- Can you arrange Mobile or Laptop for Exam in case of non-availability?   ( Yes / No )
- Your current Location details:

  1. City/Town/Village: ____________________
  2. Taluka: ____________________
  3. District: ____________________
  4. State: ____________________
  5. If you are out of town, when are you coming back? ____________________

- Differently Abled?     ( Yes / No )

  If yes, facilities required as per Examination Rules: ____________________

  ____________________

- If you have ATKT of Lower examinations, please give details: ____________________

  ____________________

## ANNEXURE - B

Date of Commencement - Second Half - 2021 (Winter) Examination

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Examination | | | | | | | | | | |
| B.E. | Sem I | Sem II | Sem III | Sem IV | Sem V | Sem VI | Sem VII | Sem VIII | | |
| | | | 23 Dec. 2021 | 24 Dec. 2021 | 22 Nov. 2021 | 07 Dec. 2021 | 22 Nov. 2021 | 07 Dec. 2021 | | |
| Examination | | | | | | | | | | |
| B.Pharm. | Sem I | Sem II | Sem III | Sem IV | Sem V | Sem VI | Sem VII | Sem VIII | | |
| | | 30 Nov. 2021 | 16 Dec. 2021 | 29 Nov. 2021 | 16 Nov. 202 | 30 Nov. 2021 | 15 Nov. 2021 | 16 Nov. 2021 | | |
| Examination | | | | | | | | | | |
| B. Arch. | Sem I | Sem II | Sem III | Sem IV | Sem V | Sem VI | Sem VII | Sem VIII | Sem IX | Sem X |
| | | 01 Oct. 2021 | 20 Dec. 2020 | 10 Oct. 2020 | 11 Oct. 2020 | 10 Oct. 2020 | 11 Oct. 2020 | 10 Oct. 2020 | 11 Oct. 2020 | 10 Oct. 2020 |
| Examination | | | | | | | | | | |
| M. Arch. | Sem I | Sem II | Sem III | Sem IV | | | | | | |
| | | 20 Oct. 2021 | 20 Dec. 2021 | 20 Oct. 2021 | | | | | | |
| Examination | | | | | | | | | | |
| Law ( 3 Years) | Sem I | Sem II | Sem III | Sem IV | Sem V | Sem VI | | | | |
| | | 04 Dec. 2021 | 26 Dec. 2021 | 05 Dec. 2021 | 01 Dec. 2021 | 02 Dec. 2021 | | | | |
| Examination | | | | | | | | | | |
| Law ( 5 Years) | Sem I | Sem II | Sem III | Sem IV | Sem V | Sem VI | Sem VII | Sem VIII | Sem IX | Sem X |
| | | 01 Dec. 2021 | 26 Dec. 2021 | 02 Dec. 2021 | 03 Dec. 2021 | 04 Dec. 2021 | 26 Dec. 2021 | 05 Dec. 2021 | 01 Dec. 2021 | 02 Dec. 2021 |
| Examination | | | | | | | | | | |
| MCA (3 Years ) | Sem I | Sem II | Sem III | Sem IV | Sem V | Sem VI | | | | |
| | 01 Dec. 2021 | 02 Dec. 2021 | 01 Dec. 2021 | 02 Dec. 2021 | 1 Dec.2021 | | | | | |
| Examination | | | | | | | | | | |
| MCA (2 Years ) | Sem I | Sem II | Sem III | Sem IV | | | | | | |
| | | 4 Jan, 2022 | 5 Jan. 2022 | | | | | | | |

DIRECTOR

BOARD OF EXAMINATIONS AND EVALUATION